
# पेशवाई – अभ्यास वर्ग



**नमस्कार बालमित्रांनो,**

छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करून रायगडावर थाटामाटात राज्याभिषेक केला. त्यांच्या निधनानंतर छत्रपती संभाजी महाराज गादीवर आले, मात्र काही वर्षांतच त्यांचा क्रूर वध झाला. त्यानंतर मराठ्यांना त्यांची राजधानी रायगडावरून हलवावी लागली आणि पुढे ऐतिहासिक घडामोडींमधून पेशवाईचा उदय झाला.

पहिले बाजीराव पेशवे यांनी पुण्यात शनिवार वाडा उभारून जवळजवळ चाळीस लढाया जिंकत मराठा साम्राज्याचा विस्तार केला. पुढील पेशव्यांनी “अटकेपार मराठी भगवा झेंडा फडकवला”. पानिपतच्या पराभवानंतरही खचून न जाता मराठ्यांनी अवघ्या दहा वर्षांत दिल्ली जिंकून पुन्हा एकदा “दिल्लीवर मराठी भगवा झेंडा फडकवला”.

अभिमानास्पद अशा या ऐतिहासिक घटनांमधून पेशव्यांविषयी अधिक जाणून घेण्यासाठी आणि आपल्या पूर्वजांचे पराक्रम समजून घेण्यासाठी आम्ही तुमच्यासाठी एक नवा व रंजक उपक्रम घेऊन आलो आहोत – **“पेशवाई अभ्यास वर्ग”**!

या उपक्रमात पेशव्यांच्या जीवनातील महत्त्वाच्या घटनांवर आधारित माहिती देण्यात आली असून, बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या संकेतस्थळावर सोडवता येईल अशी सोपी बहुपर्यायी प्रश्नावलीही उपलब्ध आहे. पालकांसोबत अभ्यास करा, विविध घटना जाणून घ्या आणि **“पेशवाई अभ्यास वर्ग”** परीक्षा उत्तीर्ण होऊन प्रमाणपत्र मिळवा. अधिक माहितीसाठी शाळेच्या संकेतस्थळाला भेट द्या.

हा अभ्यास वर्ग तयार करण्यासाठी श्री. मिलिंद कुलकर्णी तसेच सौ. यशस्विनी गोरे-लिमये यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच बृहन्महाराष्ट्र मंडळाचे शाळा संचालक श्री. राहुल देशमुख यांनी या प्रकल्पासाठी दिलेले मार्गदर्शन व सहकार्य अतिशय महत्त्वाचे ठरले. या सर्वांचे मी मनापासून आभार मानतो.

सर्व विद्यार्थ्यांना **“पेशवाई अभ्यास वर्गासाठी”** मनःपूर्वक शुभेच्छा!

आपला,




प्रसाद पानवळकर

अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ

https://bmmonline.org/

## अनुक्रमणिका

धडा ८, छत्रपती संभाजी महाराज

धडा ९, छत्रपती राजाराम महाराज

धडा १०, छत्रपती शाहू

धडा ११, पहिला बाजीराव पेशवा

धडा १२, पेशवा बाळाजी बाजीराव (नानासाहेब)

धडा १३, पानिपतचा रणसंग्राम

धडा १४, पेशवा थोरला माधवराव

धडा १५, नारायण राव पेशवा

धडा १६, सवाई माधवराव

धडा १७, पेशवाईचा शेवट

धडा १८, शूर मराठी सरदार

धडा १९, छत्रपती प्रतापसिंह

धडा २०, १८५७ चा राष्ट्रीय उठाव

**सूचना**: या अभ्यास वर्गासाठी आम्ही 'महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे' यांच्या जुन्या सहावीच्या 'आपला भारत' या पुस्तकाचा आधार घेतला आहे. विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी धडा ८ ते १७ यांचा अभ्यास करावा. धडा १८-२० हे अवांतर वाचनासाठी आहेत.

# पेशवे आणि मराठा साम्राज्य

## धडा ८ - छत्रपती संभाजी महाराज

शिवाजी महाराजांचा रायगड मृत्यू झाला त्यावेळेला संभाजी महाराज पन्हाळगडावर नजर कैदेत होते. त्यामुळे गादीवर कोणाला बसवायचे असा कारभारी मंडळींपुढे प्रश्न उभा राहिला. संभाजी महाराज हे शिवाजी महाराजांचे थोरले पुत्र असल्यामुळे त्यांचाच गादीवर हक्क होता, परंतु त्यांना बाजूला करून संभाजी महाराजांचा धाकटा सावत्र भाऊ राजाराम यांना गादीवर बसवावे असे प्रधानमंत्री मंडळींनी ठरवले. राजाराम यांची आई सोयराबाई यांनी या कामी पुढाकार घेतला. हे समजताच संभाजी महाराज पन्हाळगडावरून निसटले आणि रायगडाकडे निघाले त्या वेळेला हंबीरराव मोहिते आणि प्रल्हाद निराजी सोयराबाईचा पक्ष सोडून संभाजी राजांना मिळाले. त्यामुळे संभाजी महाराजांची बाजू बळकट झाली आणि त्यांनी त्यांच्याविरुद्ध कट करणाऱ्या लोकांना कैदेत टाकले. त्यानंतर संभाजी महाराजांनी स्वतःचा राज्याभिषेक करून घेतला

उत्तर भारतातून आलेले 'कवी कलश' हे कनोजी ब्राह्मण होते. ते संभाजी महाराजांचे प्रमुख सल्लागार होते.

संभाजी महाराज हे अत्यंत शूर आणि धाडसी होते सिद्धी, पोर्तुगीज, व मुघल या शत्रूविरुद्ध लढताना ते डगमगले नाहीत.

मुघल बादशहा औरंगजेब याचा मुलगा अकबर, वडिलांविरुद्ध बंड करून दक्षिणेत आला. दिल्लीची गादी मिळवण्यासाठी त्याने मराठ्यांची मदत मागितली, तेव्हा संभाजी महाराजांनी त्याला आश्रय दिला.

शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर मराठ्यांचे राज्य जिंकण्याच्या उद्देशाने औरंगजेब मोठी फौज घेऊन दक्षिणेत आला. संभाजी महाराजांनी त्याचा मुलगा अकबराला

आशय दिल्यामुळे तो संतापला होता. आता त्याला मराठ्यांशी युद्ध करण्याची चांगली संधी मिळाली होती.

कोकणात रायगड जिल्ह्यात जंजिरा नावाचा एक जलदुर्ग आहे. त्याच्याभोवती भक्कम तटबंदी असल्याने हा किल्ला अजिंक्य होता. त्या किल्ल्याचा ताबा सिद्धी कडे होता. सिद्धी चे लोक मराठ्यांच्या कोकण प्रांतावर हल्ला करून धुमाकूळ घालत, लुटालुट करत. संभाजी महाराजांनी जंजिरा किल्ला जिंकण्याचा बेत आखला. त्याप्रमाणे त्यांनी  जंजिरा किल्ल्याच्या समोरच असलेल्या “दंडा राजपुरी” या किल्ल्यावरून तोफांचा जोरदार मारा सुरू केला. मात्र याच वेळेला औरंगजेबाने मोठ्या सैन्यासह मराठ्यांवर आक्रमण केले, त्यामुळे संभाजी महाराजांना जंजिऱ्याची मोहीम अर्धवट टाकून औरंगजेबाच्या सैन्याविरुद्ध लढावे लागले.

गोव्यामधले पोर्तुगीज हे मराठ्यांचे दुसरे शत्रू. ते धर्मविडे होते. गोव्यातील आणि कोकणातील लोकांचा ते खूप छळ करीत, त्यांना त्रास देत. त्यामुळे त्यांचा बंदोबस्त करणे हे मराठ्यांना गरजेचे होते. संभाजी महाराजांनी पोर्तुगाजांच्या ताब्यातील दीव आणि दमण हा भाग उद्ध्वस्त केला. पोर्तुगीजांचे आरमार प्रबळ होते, त्यामुळे त्यांचा समुद्रावर पराभव करणे अशक्य होते. संभाजी महाराजांनी पोर्तुगीजांना जमिनीवरील लढाईत उतरण्यास भाग पाडले. फोंडा किल्ल्यावर दारुगोळा आणि सैन्य सज्ज केले. पोर्तुगीज हा फोंडा किल्ला जिंकण्यासाठी आले आणि संभाजी महाराजांनी त्यांचा पराभव केला. संभाजी महाराजांनी नंतर गोवा शहराला वेढा दिला आणि तेवढ्यात औरंगजेबाने पोर्तुगीजांना मदत केली. त्यामुळे संभाजी महाराजांना ही लढाई सोडून द्यावी लागली.

सिद्धी समुद्र मार्गाने मुघलांना दारूगोळा आणि धान्य पुरवठा करत असे, त्यामुळे सिद्धी ने मुघलांना पाठवलेली रसद संभाजी महाराजांनी लुटली.

संभाजी महाराजांचा सहज पराभव होत नाही हे बघितल्यावर औरंगजेबाने मराठ्यांविरुद्धची मोहीम स्थगित ठेवली. त्याने विजापूर आणि गोवळकोंडा या

राज्यांकडे आपले लक्ष वळवले आणि पुढील काही दिवसात ही दोन्ही राज्ये जिंकली.

या विजयानंतर औरंगजेबाने संपूर्ण ताकदीनिशी मराठ्यांविरुद्ध युद्ध पुकारले त्याचा सरदार मुकरबखान याने पन्हाळगडाला वेढा दिला. त्याच वेळेला कोकणातील संगमेश्वर भागात संभाजी महाराज आले आहेत अशी बातमी त्याला मिळाली. तेव्हा निवडक सैन्य घेऊन मुकरबखान संगमेश्वरला आला आणि अचानक हल्ला करून त्याने संभाजी महाराज आणि कवी कलश यांना पकडले. त्यावेळेला औरंगजेबाची छावणी पुण्याजवळ तुळापूर येथे होती. संभाजी महाराजांना औरंगजेबापुढे उभे करण्यात आले. औरंगजेबाने संभाजी महाराजांना विचारले की जर तू मुसलमान होणार असशील तर मी तुला जीवदान देतो. हे ऐकताच संभाजी महाराजांना राग आला आणि त्यांनी उत्तर दिले “प्राण गेला तरी बेहत्तर, पण मी माझा प्रिय धर्म सोडणार नाही”. हे ऐकल्यावर औरंगजेबाला राग आला आणि त्याने संभाजी महाराजांना ठार मारण्याची आज्ञा दिली. संभाजी महाराजांचा अत्यंत क्रूरपणे वध करण्यात आला. संभाजी महाराजांनी स्वराज्यासाठी, तसेच हिंदू धर्मासाठी आपले बलिदान दिले. यानंतर वढू येथे संभाजी महाराजांची एक लहानशी छत्री मराठ्यांनी बांधली.

संभाजी महाराजांच्या क्रूर वधामुळे मराठे खवळले आणि औरंगजेबाचा सूड घेतलाच पाहिजे असे त्यांना वाटू लागले. आपापसातली भांडणे विसरून स्वराज्याच्या संरक्षणासाठी एकजुटीने औरंगजेबाशी सामना करण्यास ते सिद्ध झाले.

--

# धडा ९ – छत्रपती राजाराम महाराज

संभाजी महाराजांचा वध झाला त्यावेळेला राणी येसूबाई आणि त्यांचा मुलगा शाहू हे रायगडावर होते. येसूबाईंनी सर्व अनुभवी मंडळींना एकत्र बोलावले आणि स्वराज्य वाचवण्यासाठी काय करता येईल याचा विचार केला. त्या वेळेला राजारामाने छत्रपती म्हणून कारभार स्वीकारावा असे त्यांनी सुचवले. त्याला सगळ्यांनी पाठिंबा दिला आणि राजारामाला गादीवर बसवण्यात आले.

त्याचप्रमाणे सर्वांनी आपापली भांडणे विसरून एकजुटीने शत्रूपासून स्वराज्याचे संरक्षण करावे असे ठरले. रायगडाला मुघल केव्हा वेढा घालतील याचा नेम नव्हता, त्यामुळे सर्वांनी एकत्र राहणे धोक्याचे होते. तेव्हा येसूबाई आणि राजपुत्र शाहू यांनीच फक्त रायगडावर राहावे आणि राजारामाने बाहेर पडून सुरक्षिततेसाठी कर्नाटकात दूरवर जावे असे ठरले. त्याचबरोबर संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांनी फिरते राहून मुघल सैन्यावर हल्ले करून त्यांना बेजार करावे असे पण ठरले.

काही दिवसातच औरंगजेबाचा सरदार झुल्फीखार याने रायगडाला वेढा घातला आणि पुढील काही दिवसात सूर्याजी पिसाळ याच्या फितूरी मुळे रायगड किल्ला मराठ्यांच्या हातातून मुघलांच्या ताब्यात गेला. त्याचबरोबर राणी येसूबाई व शाहू शत्रूच्या हातात सापडले. त्यांना कैद करून झुल्फीखारने त्यांना औरंगजेबापुढे उभे केले. औरंगजेबाने त्यांना नजर कैदेत ठेवले आणि त्याने राजारामाला पकडण्याची आज्ञा दिली.

राजाराम त्यावेळी विशाळगडावर होते. झुल्फीखारने रायगडा पाठोपाठ पन्हाळगड पण जिंकला. हे कळताच राजारामाने सुरक्षिततेसाठी कर्नाटकात जिंजी येथे जाण्याचे ठरवले. जिंजी हे शिवाजी महाराजांच्या कर्नाटकातील जहागिरीचे एक बळकट ठिकाण होते. जिंजीचा किल्ला अजिंक्य होता. हा दूर असलेला किल्ला मुघलांना जिंकणे फारच अवघड होते.

जिंजीला पोहचल्यावर राजारामाने अष्टप्रधान मंडळाची नेमणूक केली. आता जिंजी हे मराठ्यांच्या राजधानीचे ठिकाण झाले. या दरम्यान दक्षिणेतील जिंजी पासून उत्तरेतील खानदेशापर्यंत संताजी आणि धनाजी यांनी मुघलांना सळो की पळो करून सोडले. गनिमी काव्याच्या युद्ध पद्धतीने त्यांनी अचानक शत्रूच्या सैन्यावर हल्ले करून अनेक वेळा लुटालूट केली.

राजाराम जिंजीला पोहचला आहे हे कळतात औरंगजेबाने झुल्फीकारखानला तिथे वेढा घालण्यास पाठवले. जिंजीचा किल्ला भक्कम होता, तसेच त्याचा बंदोबस्त ही कडेकोट होता. मराठ्यांनी किल्ला मोठ्या शर्थीने लढवला. सात वर्षे झाली तरीही किल्ला न मिळाल्याने औरंगजेब वैतागला. त्यानंतर वेढ्याचे काम जोरात सुरू झाले आणि किल्ला जिंकायचा या हिरारीने औरंगजेबाने तयारी केली.

गणोजी शिर्के हा मराठा सरदार छत्रपतींचा नातेवाईक होता, पण संभाजी महाराजांवर चिडून तो मुघल सैन्याला जाऊन मिळाला होता. जिंजीच्या वेढ्यात तो खानाबरोबर होता. खंडोबल्लाळ यांनी गणोजी शिर्के यांच्या गोटात जाऊन त्यांची भेट घेतली आणि राजारामाला गडावरून निसटून जाण्यास वाट द्यावी अशी विनंती केली, तसेच आपले स्वतःचे दाभोळचे वतन गणोजी शिर्के यांच्या नावे करून दिले. गणोजी शिर्के तयार झाले आणि त्यांनी राजारामाला निसटून जाण्यासाठी वाट करून दिली. राजाराम त्या वेढ्यातून निसटले. सात वर्षानंतर झुल्फीकारखानने जिंजीचा किल्ला जिंकला खरा, मात्र राजाराम तिथून पळून गेल्यामुळे औरंगजेबाची निराशा झाली.

राजाराम जिंजी वरून आल्यावर ते पुण्यातील सिंहगडावर आले. इथे आल्यावरही त्यांनी औरंगजेबाबरोबर लढण्याची तयारी चालवली. त्यानंतर त्यांनी वऱ्हाड आणि खानदेश या भागांपर्यंत मोहिमा काढून खंडणी वसूल केली. मात्र या दगदगीमुळे ते आजारी पडले आणि पुढे काही दिवसातच ते सिंहगडावर निधन पावले. त्या वेळेला त्यांचे वय फक्त ३० वर्षांचे होते.

त्यांच्या मृत्यूनंतर त्यांची पत्नी, राणी ताराबाई, हिने आपला मुलगा शिवाजी यांना गादीवर बसवले आणि सर्व सत्ता आपल्या हाती घेतली. राजारामाच्या मृत्यूनंतर औरंगजेबाला पुन्हा यशाची आशा लागली, परंतु शूर आणि कर्तबगार ताराबाईने त्याची आशा धुळीला मिळवली. ताराबाई ही शिवाजी महाराजांचे सेनापती, हंबीरराव मोहिते, यांची मुलगी होती. त्यांचा पराक्रम आणि खणखरपणा तिच्या अंगी होता. न घाबरता मराठ्यांचे नेतृत्व आपल्याकडे घेऊन तिने जोमाने स्वातंत्र्याचा लढा दिला.

मुघलांशी लढून तिने पन्हाळा, रायगड, सिंहगड, आणि तोरणा हे किल्ले पुन्हा जिंकून घेतले. औरंगजेब हताश झाला. त्याचे वय ९० वर्षांचे झाले होते. मराठ्यांना जिंकण्यासाठी तो २७ वर्षे धडपड करीत होता. त्याने खूप पैसा खर्च केला, पण त्याला यश आले नाही. अखेर निराश होऊन तो अहमदनगर येथे मरण पावला आणि त्याची दख्खन जिंकण्याची महत्त्वकांक्षा धुळीला मिळाली.

--

## धडा १० - छत्रपती शाहू

औरंगजेबाचा मृत्यू झाला तेव्हा त्याचा मुलगा शाहआलम (मुअज्जम) हा काबूल येथे होता, तर त्याचा दुसरा मुलगा आझमशहा हा दक्षिणेत होता. आझमशहाच्या तावडीत येसूबाई आणि शाहू महाराज होते. आझमशहा याने दिल्लीला परत जात असताना शाहू महाराजांना सोडले, मात्र येसूबाई अजूनही त्याच्या कैदेत होती. शाहआलम आणि आझम शहा यांची आग्रा येथे लढाई झाली, त्यात आझमशहा हा मारला गेला, त्यामुळे शाहआलम हा नवीन बादशहा झाला. शाहआलमने "बाहदूरशाह" ही पदवी धारण करून तो दिल्लीच्या गादीवर बसला.

शाहू महाराजांची सुटका झाल्यामुळे ते साताऱ्याला परत आले आणि त्यांनी स्वतःला मराठा साम्राज्याचे वारसदार म्हणून घोषित केले. त्या वेळी ताराबाई मराठा साम्राज्य चालवत होत्या. बाळाजी विश्वनाथ भट हे धनाजी जाधव यांचे

कारभारी होते. त्यांनी शाहू महाराज हेच मराठ्यांचे वारसदार आहेत हे पटवून दिल्याने धनाजी जाधव, की जे ताराबाई यांच्या बाजूला होते, ते शाहू महाराजांना येऊन मिळाले. भीमा नदीच्या काठी खेड येथे शाहू व ताराबाई यांच्या सैन्यांमध्ये लढाई झाली त्यात ताराबाईचा पराभव झाला. आता सातारा ही शाहू महाराजांची राजधानी झाली, तर ताराबाई हिने कोल्हापूर जवळील पन्हाळगड ही तिची राजधानी केली आणि तिचा मुलगा शिवाजी (दुसरा) हा कोल्हापूरच्या गादीवर बसवला. मात्र काही दिवसांनी राजारामाची दुसरी बायको राजसबाई हिने ताराबाईला व शिवाजी (दुसरा) यांना कैदेत टाकले व तिचा मुलगा संभाजी (दुसरा) याला कोल्हापूरच्या गादीवर बसवले.

बाळाजी विश्वनाथ भट हे मूळचे श्रीवर्धनचे. ते चिपळूणच्या मिठागरावर वसुली करणारे अधिकारी होते. सिद्धी त्यावेळेला कोकणामध्ये राज्य करीत होता. सिद्धीच्या छळाला कंटाळून ते देशावर आले. धनाजी जाधव यांच्या मृत्यूनंतर वसुलीचे काम करण्याचे काम शाहू महाराजांनी बाळाजीला दिले. चंद्रसेन जाधव यांना शाहू महाराज यांची ही कृती आवडली नाही आणि ते रागावून ताराबाई यांना जाऊन मिळाले. बाळाजी भट यांच्या कामावर खूष होऊन शाहू महाराजांनी बाळाजी विश्वनाथ यांना “सेनाकर्ते” ही पदवी दिली. बाळाजीने कान्होजी आंग्रे यांना शाहू हेच स्वराज्याचे खरे वारसदार आहेत हे पटवून दिले त्यामुळे ताराबाई यांच्या पक्षातून कान्होजी आंग्रे हे शाहू महाराजांकडे आले. बाळाजीने त्यांचे मराठ्यांच्या आरमाराचे प्रमुखपद कायम ठेवले.

दिल्लीत यावेळी फारूक सियर नावाचा बादशहा होता. त्याच्याकडे सय्यद बंधू नावाचे वजीर होते. बादशहाचे या सय्यद बंधू बरोबर पटत नसे. बादशहाने त्यातल्या हुसेन सय्यद नावाच्या वजीराला दक्षिणेत पाठवले. हुसेन सय्यद याने मराठ्यांबरोबर करार केला. हा करार करण्यात बाळाजी विश्वनाथ यांनी मोठा वाटा उचलला. या करारावर मंजुरी घेण्यासाठी आणि सय्यद बंधूंना मदत करण्यासाठी बाळाजी भट (पेशवे) आपली फौज घेऊन उत्तरेत दिल्लीपर्यंत गेले. याच वेळी

फारूक सियर चा खून झाला. तेव्हा सय्यद बंधूंनी नवा बादशहा गादीवर बसवला. या बादशहाने बाळाजी भट यांच्या कराराला मान्यता दिली. परत येताना बाळाजी भट यांनी येसूबाई यांची सुटका करून घेतली. या कराराने मराठ्यांचे दिल्ली दरबारात महत्त्व वाढले आणि फार मोठा प्रदेश त्यांच्या वर्चस्वाखाली आला.

बाळाजीने सरंजाम पद्धतीने मुलखाची वाटणी केली. आपापल्या मुलुखात सरदार स्वतंत्रपणे कारभार करत व खंडणी सरकारकडे जमा करत. त्यांना स्वतःचे स्वतंत्र सैन्य ठेवता येत असे आणि गरज पडल्यास हे सैन्य एकत्र येऊन स्वराज्यासाठी लढत असे. बाळाची भट यांचे सासवड येथे निधन झाले.

--

## धडा ११ - पहिला बाजीराव पेशवा

बाळाजी विश्वनाथ भट मरण पावल्यावर त्यांचा थोरला मुलगा बाजीराव याला शाहू महाराजांनी पेशवे पद दिले. त्यावेळी बाजीरावांचे वय फक्त वीस वर्षांचे होते. बाजीराव यांच्या भावाचे नाव चिमाजी.

बाजीराव यांनी माळवा प्रांतात शिंदे, होळकर, पवार या सरदारांची नेमणूक केली.

बुंदेलखंडातील छत्रसाल राजाला माळव्याचा सुभेदार बंगश त्रास देत असे. जैतपूर येथील लढाईत बाजीरावाने बंगशचा पराभव केला.

निजामाच्या चिथावणीमुळे कोल्हापूरच्या संभाजीने शाहू च्या राज्यावर स्वारी केली परंतु शाहू ने त्यांचा पराभव केला. वारणा येथे शाहू व संभाजी यांच्यामध्ये तह होऊन वारणा नदी ही सातारा व कोल्हापूर या दोन राज्यातली सरहद्द ठरली.

मधल्या काळात बाजीरावाने पुण्यात शनिवार वाडा बांधला.

निजाम उल्मुक हा मुघल सुभेदार होता तो भागानगर (हैद्राबाद) येथे राज्य करत होता. बाजीरावाने पालखेड येथे निजामाचा पराभव केला. त्यानंतर बाजीरावाने भोपाळ येथे परत एकदा निजामाचा पराभव केला. नंतर मराठ्यांनी

पोर्तुगीजांबरोबर लढाई करून वसई येथील किल्ला जिंकला आणि पोर्तुगीजांना या भागातून हटवले.

यानंतर इराणचा राजा नादिरशहा याने भारतावर स्वारी केली आणि  दिल्लीचा बादशाहला कैद केले. खूप संपत्ती लुटून तो परत जायला निघाला. ही बातमी जेव्हा बाजीरावला कळली तेव्हा तो मोठे सैन्य घेऊन उत्तरेकडे निघाला. मात्र दुर्दैवाने तो वाटेत आजारी पडला. त्याचे दुखणे विकोपाला गेले. अखेर नर्मदा नदीच्या काठी रावेरखेडी या गावी त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. त्या वेळा त्यांचे वय फक्त चाळीस वर्षांचे होते.

--

## धडा १२ - पेशवा बाळाची बाजीराव (नानासाहेब)

बाजीरावाच्या मृत्यूनंतर शाहू ने त्यांचा मोठा मुलगा बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब यांना पेशवे पद दिले.

शाहू यांना मुलगा नसल्यामुळे त्यांनी ताराबाई यांचा नातू रामराजा यांना गादीचा वारस नेमले आणि मराठी राज्याचा कारभार यापुढे पेशव्यांनी पहावा आणि पेशवे पद नानासाहेबांकडे वंशपरंपरागत जावे असे सांगितले.

शाहू वयाच्या १८ वर्षापर्यंत मुघलांच्या कैदेत होते. त्यांनी ४२ वर्षे राज्य केले.

शाहू यांच्या मृत्यूनंतर पेशवे पुण्यातून राज्यकारभार पाहू लागले त्यामुळे पुण्याचे महत्त्व वाढले.

नागपूरच्या रघुजी भोसले यांचे बंगाल आणि ओरिसा भागात वर्चस्व होते मात्र तो पेशव्यांची सत्ता जुमानत नसे.

नानासाहेबांनी त्याच्यावर स्वारी करून त्याला वठणीवर आणले. शाहूने मध्यस्थी करून त्या दोघांमध्ये सलोखा निर्माण केला.

रामराजा आपल्या सल्ल्याने राज्यकारभार करेल असे ताराबाईला वाटले होते पण तसे झाले नाही, त्यामुळे आपल्या हाती सत्ता घेण्यासाठी तिने दमाजी गायकवाड याला बोलावले. ही गोष्ट कळताच पेशव्यांनी दमाजी गायकवाडवर स्वारी करून त्याला हरवले आणि ताराबाईला कैद केले.

नानासाहेबांनी इंग्रजांना बरोबर घेऊन तुळाजी आंग्रे याला हरवले कारण तो पेशव्यांची सत्ता जुमानत नसे.

मराठ्यांचा दक्षिणेतील मोठा शत्रू म्हणजे हैदराबादचा निजाम.

नानासाहेब यांनी निजामास भालकी येथे हरवले, तेव्हा गोदावरी आणि तापी नद्यांमधला प्रदेश पेशव्यांना देण्याचे निजामाने कबूल केले.

चिमाजी आप्पा यांचा मुलगा सदाशिव भाऊ - त्याने निजामाबरोबर उदगीर येथे लढाई जिंकली. उदगीरच्या तहामध्ये दौलताबाद व अशीरगड हे किल्ले मराठ्यांना मिळाले.

त्यानंतर मराठ्यांनी दक्षिणेतील कृष्णा व तुंगभद्रा या दोन नद्यांमधील प्रदेश आपल्या ताब्यात आणला आणि नंतर श्रीरंगपट्टण येथे म्हैसूरच्या राजाचा त्यांनी पराभव केला. यामुळे जवळजवळ संपूर्ण दक्षिण भारत मराठी सत्तेच्या वर्चस्वाखाली आला.

अयोध्याचा नबाब सफदरजंग हा दिल्लीच्या बादशहाचा वजीर होता. त्याचे रोहिल्या लोकांची वैर होते. गंगा आणि यमुना या दोन नद्यांमधील प्रदेशात हे रोहिले लोक राहत असत. ते अयोध्येत सारख्या स्वाऱ्या करत आणि तेथील लोकांना त्रास देत. रोहिल्यांना हरवण्यासाठी सफदरजंग ने मराठ्यांकडे सहाय्य मागितले. त्यावेळेला शिंदे आणि होळकर या सरदारांनी सफदरजंगला मदत केली आणि रोहिल्यांवर स्वारी करून त्यांना पराभूत केले.

रोहिल्यांना पराभूत केल्यामुळे सफदरजंग खूष झाला त्याने. मराठ्यांना खूप मोठी सनद देऊ केली परंतु बादशहाने त्या सनदीला मान्यता दिली नाही. हे कळल्यावर

मराठे खवळले व त्यांनी या प्रदेशावर स्वराक्रमाने आपले वर्चस्व गाजवण्याचे ठरवले.

नजीबखान हा रोहिल्यांचा पराक्रमी सरदार होता. मराठ्यांचे उत्तरेकडचे वर्चस्व त्याला सहन झाले नाही. मराठ्यांना हरवण्यासाठी त्याने अफगाणिस्तानचा राजा अहमदशहा अब्दाली याला भारतावर स्वारी करण्यासाठी बोलवले. ही बातमी कळताच नानासाहेबांनी आपला भाऊ रघुनाथराव याला उत्तरेत पाठवले. रघुनाथ रावाने उत्तरेत जाऊन अब्दाली ने घेतलेला प्रदेश परत मिळवला आणि दिल्लीत मराठ्यांचे वर्चस्व प्रस्थापित केले.

मराठ्यांचे वाढते वर्चस्व बघून नजीबखान परत एकदा चिंताग्रस्त झाला. त्याने पुन्हा एकदा अहमदशहा अब्दाली ला मदतीला बोलावले. अब्दाली ही परत एकदा उत्तर भारतात आला. त्याने मथुरा आणि आग्रा शहरे लुटली  आणि दिल्ली जिंकून तो परत गेला.

हे कळल्यावर नानासाहेबांनी रघुनाथराव आणि मल्हारराव होळकर यांना उत्तरेस पाठवले. त्यांनी दिल्ली जिंकली. याच वेळेला नजीबखान त्यांच्या हातात सापडला, परंतु मल्हारराव होळकरांनी मध्यस्थी केल्यामुळे त्याची सुटका झाली.

रघुनाथराव नंतर पंजाबला गेला. पंजाब जिंकून त्याने अब्दाली च्या सुभेदाराचा थेट अटकेपर्यंत पाठलाग केला. अशा रीतीने मराठ्यांनी आपला भगवा झेंडा अटकेपार फडकवला. मराठ्यांच्या पराक्रमाचा हा कळस म्हणायला हरकत नाही.

--

# धडा १३ - पानिपतचा रणसंग्राम

मराठ्यांचा विस्तार आता अटकेपर्यंत झाला होता. मात्र त्यांचा शत्रू नजीबखान याचा पूर्णपणे बंदोबस्त झाला नव्हता. त्याला हरवण्यासाठी नानासाहेब पेशव्यांनी दत्ताजी आणि जनकोजी शिंदे यांना उत्तरेत पाठवले, मात्र दत्ताजी नजीबखाना बरोबर युद्ध करण्याऐवजी त्याच्याशी वाटाघाटी करत राहिला. या काळात नजीबखानने परत एकदा अब्दालीला मदतीला बोलावले. अब्दाली मोठे सैन्य घेऊन भारतात आला. हे कळतात दत्ताजी ला खूप राग आला आणि त्याने सरळ अब्दाली वर हल्ला चढवला. अब्दालीच्या सैन्यापुढे दत्ताजी ची शक्ती कमी पडली. या वेळेला मल्हार होळकरांची मदत दत्ताजीला मिळाली नाही. यमुना नदीच्या काठावर अब्दाली आणि दत्ताजी च्या सैन्यात मोठी लढाई झाली. दत्ताजी खूप मोठ्या शौर्याने लढला, पण त्याचा उपयोग झाला नाही. नजीबखानाचा सल्लागार कुतुबशहा याने दत्ताजी ला "तू अजून लढशील का?" असे विचारले तेव्हा दत्ताजी ने "बचेंगे तो और भी लढेंगे" असे उत्तर दिले. त्यानंतर चिडलेल्या कुतुबशहाने दत्ताजीला ठार मारले.

दत्ताजी च्या निधनाची बातमी पुण्यात पोचतात नानासाहेबांनी त्यांचा मुलगा विश्वासराव, चिमाजी आप्पांचा मुलगा सदाशिव भाऊ यांना प्रचंड सैन्य देऊन उत्तरेला पाठवले. इब्राहिम खान गारदि ही आपला सुसज्ज तोफखाना घेऊन या मोहिमेत सामील झाला. दिल्लीच्या वाटेवर असताना आग्रा येथे शिंदे आणि होळकर मराठ्यांच्या सैन्याला येऊन मिळाले. आपापली भांडणे विसरून शत्रूचा सूड घ्यायचा या भावनेने सगळे मराठी सरदार या वेळेला एकत्र आले होते. त्यानंतर मराठ्यांनी दिल्ली जिंकली.

पुढे काही महिन्यानंतर मराठ्यांचे सैन्य पानिपत येथे पोहचले. तिथे अब्दालीचे पण सैन्य होते. मराठ्यांनी अब्दालीची अफगाणिस्तान कडे जाणारी वाट अडवली होती, तर अब्दालीने मराठ्यांची दक्षिणेत पुण्याकडे जाणारी वाट अडवली होती. मात्र अब्दालीला अयोध्येचा वजीर व नजीबखानाकडून धान्य व युद्ध साहित्य मिळत

होते, या उलट मराठ्यांकडेची रसद संपत चालली होती. त्यामुळे त्यांच्याकडे युद्ध करण्याशिवाय कोणताच पर्याय उरला नव्हता.

अखेर १४ जानेवारी १७६१ हा दिवस उजाडला. सकाळी नऊ वाजता युद्धाला सुरुवात झाली आणि दोन्ही सैन्यात मोठी लढाई सुरू झाली. दुपारपर्यंत मराठ्यांची सरशी होती, मात्र त्यानंतर युद्धाचा रंग पालटला. हत्तीवर बसलेल्या विश्वासराव पेशवे यांना अचानक गोळी लागल्यामुळे ते ठार झाले हे कळतात सदाशिव भाऊंना फार दुःख झाले. ते हत्तीवरून उतरून घोड्यावर स्वार झाले आणि मोठ्या गर्दीत घुसले. जनकोजी शिंदे पण खूप त्वेषाने लढत होते. ते मराठ्यांच्या भगव्या झेंड्याचे रक्षण करत होते. इतक्यात अब्दालीने आपली राखीव व ताज्या दमाची फौज मैदानात आणली आणि मराठ्यांवर जोरात हल्ला चढवला. यामध्ये मराठ्यांचा पूर्ण पराभव झाला. या लढाईत जवळजवळ दीड लाख लोक मारले गेले त्यात अनेक कर्तबगार पराक्रमी मराठी सरदारांचा समावेश होता. मराठ्यांची जवळजवळ एक पूर्ण पिढीच पानिपतावर मरण पावली.

पानिपता च्या पराभवामुळे सारा महाराष्ट्र दुःखात बुडाला. नानासाहेब पेशवे यांना खूप मोठा धक्का बसला. “भाऊ - भाऊ” असा आक्रोश करत त्यांनी पर्वतीवर प्राण सोडला. मराठ्यांबरोबर अब्दालीचेही या युद्धामुळे फार मोठे नुकसान झाले. या युद्धामुळे कुणाचाच फायदा झाला नाही. मराठ्यांचे उत्तरेकडचे वर्चस्व नष्ट झाले. अब्दाली ही अफगाणिस्तानात परत गेला. मराठी आणि मुसलमान या दोन्ही सत्ता दुबळ्या झाला. त्याचा फायदा इंग्रजांनी घेतला. बंगाल आणि कर्नाटकात आपली सत्ता प्रस्थापित करण्यासाठी इंग्रजांना चांगली संधी मिळाली.

--

# धडा १४ - पेशवा थोरला माधवराव

पानिपतच्या पराभवानंतर काही महिन्यांनी नानासाहेब पेशवे यांचे पर्वतीवर निधन झाले. त्यांना तीन मुलगे होते - थोरला मुलगा विश्वासराव, हा पानिपतच्या युद्धात मारला गेला, त्यामुळे दुसरा मुलगा माधवराव यांना पेशवे पद मिळाले. त्यावेळेला ते फक्त सोळा वर्षाचे होते. धाकटा नारायणराव हा तर सहा वर्षांचा होता. माधवराव वयाने लहान असल्यामुळे त्यांचे काका रघुनाथराव हे राज्याचा कारभार पाहू लागले, मात्र काका आणि पुतण्याचे फार दिवस पटले नाही.

मराठा साम्राज्य या वेळेला संकटात होते. त्यांच्याकडचे पैसे संपले होते. मोठे मोठे सरदार पानिपतावर मरण पावले होते. याच काळात काका रघुनाथराव यांनी पेशवे पदाचा लोभ धरला होता.

पानिपतच्या पराभवानंतर मराठ्यांची उत्तरेतली सत्ता नष्ट झाली होती, तर दक्षिणेत हैद्राबादचा निजाम आणि म्हैसूरचा हैदर हे मराठ्यांविरुद्ध उभे होते. त्याचबरोबर इंग्रज आणि फ्रेंच या परकीय शक्तींचा उपद्रव वाढत होता. माधवरावांवर खूप मोठी जबाबदारी होती, मात्र आपल्या कर्तुत्वाने त्यांनी मराठी साम्राज्याला संकटातून वाचवले आणि पूर्वीचे वैभव परत मिळवून दिले.

या काळात रघुनाथराव मनमानीपणे वागत होता. त्याला पेशवेपद हवेच होते. मात्र त्याच्या या स्वभावामुळे काही मराठी अधिकाऱ्यांशी त्याचे भांडण झाले आणि ते निजामाला जाऊन मिळाले. त्यामुळे निजामाची बाजू बळकट झाली. त्याने पेशव्यांबरोबर लढाई करण्याची तयारी केली. मराठ्यांच्या प्रदेशात येऊन तो लुटालुट करू लागला.

तेव्हा माधवराव आणि रघुनाथराव या दोघांनी मिळून पैठण जवळ गोदावरी नदीच्या काठी 'राक्षस भुवन' येथे निजामा विरुद्ध लढाई केली. यात निजामाचा दिवाण विठ्ठल सुंदर ठार झाला. माधवरावाने या लढाईत मोठा पराक्रम गाजवला.

रघुनाथराव शत्रूच्या तावडीत सापडला होता, मात्र त्याची सुटका केली आणि निजामाला पूर्णपणे पराभूत केले.

हैदर अली हा म्हैसूरचा हिंदू राजा वडीयार याचा सेनापती व दिवाण होता. पुढे हैदर अलीने वडीयार राजाला बाजूला सारून त्याचे राज्य स्वतःच्या ताब्यात घेतले. कृष्णा आणि तुंगभद्रा या नद्यांमधील मराठ्यांच्या ताब्यातील प्रदेश हैदरने बळकावला. माधवरावाने मराठी सरदारांना पाठवून त्याच्याबरोबर युद्ध केले व त्याला शरण आणले. हैदरने मराठ्यांबरोबर तह करून मराठ्यांचा जिंकलेला मुलुख परत केला. काही दिवसांनी हैदरने हा तह मोडला आणि तो परत मराठ्यांवर चालून आला. नंतर झालेला युद्धात हैदर मराठ्यांना शरण आला व त्याने तहाची बोलणी सुरू केली. हैदरने तुंगभद्रा नदीपर्यंतच्या मराठी राज्याला मान्यता दिली, तसेच शिवाजी महाराजांच्या काळातील कर्नाटकातील प्रांत, आणि खूप मोठी रक्कम दिली यामुळे पानिपतच्या पराभवामुळे उत्तरेत झालेले बरेचसे नुकसान भरून निघाले.

काका रघुनाथरावाला माधवराव यांना मिळालेले यश सहन होत नव्हते. त्यांनी पेशवे पद मिळवण्यासाठी कारस्थाने सुरू केली व पेशव्यांकडे राज्याची मागणी केली, पण माधवरावांनी ते देण्याचे साफ नाकारले. हे पाहून रघुनाथराव संतापला. त्यांनी भोसले व गायकवाड यांना आपल्या बाजूला वळवून घेतले. हे कळताच माधव रावांनी त्यांच्यावर स्वारी केली आणि धोडप येथे पराभव केला. त्यानंतर रघुनाथराव याला शनिवार वाड्यात नजर कैदेत ठेवले. नागपूरचे जानोजी भोसले यांनाही माधवरावाने वठणीवर आणले.

पानिपतच्या पराभवामुळे मराठ्यांची उत्तर भारतातली सत्ता खिळखिळी झाली होती. रजपूत, जाट, रोहिले, आणि बुंदेले हे कोणीही मराठ्यांना जुमानत नव्हते. मुघल बादशहा शाह आलम हा इंग्रजांच्या आश्रयाला गेला होता. तो इंग्रजांच्या मर्जीप्रमाणे वागत होता. इंग्रजांच्या मदतीने तो दिल्लीची गादी मिळवण्याचा प्रयत्न करत होता.

माधवरावाने महादजी शिंदे, तुकोजी होळकर, आणि इतर शूर सरदारांना उत्तरेत आपली सत्ता बसवण्यासाठी पाठवले.

महादजी शिंदे यांनी जाट व रजपूत यांना वठणीवर आणले. तसेच नजीब खानाचे ही पारिपत्य केले. रोहिले व पठाण यांनाही जरब बसवली. दिल्लीचा बादशहा शाह आलम याला परत एकदा दिल्लीच्या गादीवर बसवले. अशा रितीने मराठा सरदारांनी पानिपतच्या पराभवाचा कलंक धुवून काढला. यामुळे दिल्लीचा कारभार परत एकदा मराठ्यांच्या हाती आला. दिल्ली दरबारात मराठ्यांचे वर्चस्व प्रस्थापित करण्याची बाजीरावाची महत्त्वकांक्षा महादजी शिंदेने पुरी केली.

दरम्यान इंग्रजांनी समुद्रकिनाऱ्यावर आपली सत्ता वाढवण्यास सुरुवात केली होती. माधवरावांनी इंग्रजांना दम भरला आणि सांगितले की आमच्या शत्रूंना मदत केलीत तर परिणाम गंभीर होतील.

माधवराव पेशवे यांच्या दरबारी नाना फडणवीस हे कारभारी तर रामशास्त्री प्रभुणे हे थोर न्यायाधीश होते. माधवरावांच्या काळात पुण्याचा खूप मोठा विकास झाला. लोकांवरचे जाचक कर त्यांनी कमी केले. विहिरी खोदून त्यांनी पुण्याचा पाणीपुरवठा वाढवला. दारुगोळा तोफा यांचे कारखाने सुरू केले आणि नाणी पाडण्यासाठी टाकसाळीची व्यवस्था केली. अवघ्या अकरा वर्षाच्या काळात माधवरावांनी प्रचंड कामगिरी केली आणि त्यांनी मराठी राज्याला पुन्हा एकदा वैभवाचे दिवस दाखवले.

वयाच्या २८ व्या वर्षी माधवराव यांना क्षयरोगाने पछाडले आणि आजार वाढत जाऊन अखेर माधवराव पेशवे पुण्याजवळील थेऊर येथे मरण पावले. त्यांच्या या अकाली मृत्यूमुळे मराठा साम्राज्याचे खूप मोठे नुकसान झाले.

--

# धडा १५ - नारायण राव पेशवा

माधवरावांच्या अकाली मृत्यूनंतर त्यांचा धाकटा भाऊ नारायणराव यांना पेशवे पद मिळाले. ते वयाने लहान असल्यामुळे त्यांचे काका रघुनाथराव राज्याचा कारभार बघू लागले.

नारायण रावांचा स्वभाव हेकेखोर होता. त्यांनी बऱ्याच अधिकाऱ्यांची मने दुखावली, त्यामुळे ते अप्रिय होते. सुरुवातीला ते काका रघुनाथरावांच्या सांगण्याप्रमाणे वागत होते, पण नंतर मात्र ते स्वतंत्रपणे कारभार करू लागले. त्याचा रघुनाथरावांना राग आला आणि त्यांनी स्वतःला पेशवे पद मिळवण्यासाठी कारस्थाने सुरू केली.

रघुनाथ रावाने हैदर व निजाम यांच्याशी मदतीसाठी बोलणी केली. हे कळल्यावर नारायण रावांना राग आला आणि त्याने काकांना शनिवार वाड्यात नजर कैदेत ठेवले. तेव्हा रघुनाथ रावाने इतर लोकांच्या मदतीने पेशवा नारायणरावा विरुद्ध कट रचला. शनिवार वाड्यात पहारा करणाऱ्या गारद्यांना या गटात सामील करून घेतले. त्यांनी "नारायणास धरावे" असे पत्र पाठवले, मात्र "धरावेचे मारावे" असा बदल करण्यात आला.

एका दुपारी जेवण झाल्यावर काही गारदी नारायण रावाकडे गेले. नारायणरावाला शंका आल्यावर तो रघुनाथ रावांकडे धावत गेला आणि "काका मला वाचवा" असे म्हणाला, परंतु रघुनाथराव उर्फ राघोबा त्याला वाचवू शकले नाहीत. सुमेर सिंग नावाच्या गारद्याने नारायण रावाला ठार मारले. नारायण रावाच्या खुनाची बातमी पुण्यात पसरली आणि सर्व सरदार आणि कारभारी मंडळी शनिवार वाड्यात एकत्र जमली आणि त्यांनी रघुनाथ नावाचा निषेध केला. दुसऱ्या दिवशी रघुनाथ राव पेशवा झाल्याची गारद्यांनी घोषणा केली.

यावेळी राम शास्त्री प्रभुणे हे सर न्यायाधीश होते. त्यांनी राघोबाला "तुझ्या हातून खूप मोठे पाप घडले आहे या पापस देहांत प्रायश्चिता शिवाय दुसरे प्रायश्चित नाही" असे स्पष्टपणे सांगितले आणि अधिकार पद सोडून ते पुण्याबाहेर निघून गेले. नाना

फडणवीस आणि इतर मंडळींनी रघुनाथ रावाला पेशवाई मिळून द्यायची नाही असा निश्चय केला.

रघुनाथ रावाची पेशवा बनण्याचे स्वप्न पूर्ण झाले. पण याच वेळेला हैदरने मराठी राज्यावर चाल केली आणि काही मुलुख हस्तगत केला. तेव्हा हैदरला हरवण्यासाठी रघुनाथराव सैन्य घेऊन पुण्याबाहेर पडले. ते बाहेर गेल्यावर त्यांना पेशवे पदावरून हाकलून देण्यासाठी जे कारस्थान झाले त्याला “बारभाई कारस्थान” असे म्हणतात. या कारस्थानात नाना फडणवीस, सखाराम बापू, फडके, पेठे, पटवर्धन, इत्यादी मंडळी सामील होती.

या काळात नारायण रावाची बायको गंगाबाई गरोदर होती. तिला मुलगा झाला तर ठीक होते, मात्र मुलगी झाली असती तर एक मुलगा दत्तक घेऊन त्याच्या नावाने राज्यकारभार चालवायचा असे सगळ्यांनी ठरवले. गंगाबाईला सुरक्षिततेसाठी त्यांनी पुरंदर गडावर ठेवले आणि तिच्या नावाने राज्यकारभार पाहण्यास सुरुवात झाली.

ही बातमी कळताच रघुनाथ राव, हैदर वरील मोहीम बाजूला ठेवून पुण्याकडे परतले. मात्र पंढरपूर जवळ कासेगाव या गावी त्रिंबकराव पेठे यांच्या फौजे बरोबर त्यांची गाठ पडली. दोघांमध्ये लढाई झाली. या वेळी पेठे मारले गेले. ही बातमी कळताच हरीपंत फडके रघुनाथ रावांवर चालून गेले. त्यांनी भोसल्यांना मदतीला बोलावले. मात्र आपला निभाव लागणार नाही हे कळल्यावर रघुनाथराव उत्तरेला बऱ्हाणपूर कडे पळाले. दरम्यान पुरंदर किल्ल्यावर गंगाबाईला मुलगा झाला. सगळीकडे आनंदी आनंद झाला. या मुलाचे नाव “सवाई माधवराव” असे ठेवले आणि ते ४० दिवसांचे असताना छत्रपतींनी त्याला पेशवे पदाची वस्त्रे दिली. या बाल पेशव्यांच्या वतीने नाना फडणवीस कारभार करू लागले.

--

# धडा १६ - सवाई माधवराव

पेशवे पद मिळण्याची रघुनाथ रावांची इच्छा आता धुळीला मिळाली होती. ते बुऱ्हाणपूर कडे पळत असताना त्यांचा पाठलाग करत हरी पंत फडके मागोमाग गेले. आपल्याला शिंदे आणि होळकरांची मदत मिळणे कठीण आहे हे कळल्यावर रघुनाथराव गुजरात मध्ये पळून गेले. रघुनाथराव व हरिपंत फडके यांच्यात मही नदीच्या काठी लढाई झाली. त्यात रघुनाथरावांचा पराभव झाला. तेव्हा हताश होऊन ते सुरत मध्ये इंग्रजांकडे गेले आणि इंग्रजांकडे मदत मागितली. इंग्रज खूष झाले. त्यांनी रघुनाथरावांबरोबर सुरत येथे तह केला. या तहानुसार रघुनाथरावांना इंग्रजांना बरेच काही पैसे आणि मोक्याचा प्रदेश देऊ केला. रघुनाथरावांच्या अशा स्वार्थीपणामुळे मराठी राज्यात इंग्रजांचा शिरकाव झाला.

इंग्रजांना बरोबर घेऊन रघुनाथराव बोरघाट मार्गे मराठ्यांवर चालून आले. या वेळेला महादजी शिंदे यांच्या विरुद्ध इंग्रजांची लढाई वडगाव येथे झाली. त्यात इंग्रजांचा पराभव झाला. इंग्रजांनी वडगाव येथे मराठ्यांबरोबर तह केला. या तहानुसार इंग्रजांनी मराठ्यांचा घेतलेला मुलुख परत द्यावा आणि रघुनाथ रावाला मराठ्यांच्या स्वाधीन करावे असे ठरले. इंग्रजांनी रघुनाथ रावाला शिंदे यांच्या स्वाधीन केले, मात्र रघुनाथराव शिंदेंबरोबर उत्तरेत जात असताना त्यांनी वाटेत पळ काढला आणि ते परत इंग्रजांच्या आशयाला गेले. वडगावच्या तहात कबूल केल्याप्रमाणे इंग्रज वागले नाहीत आणि परत त्यांनी युद्धाची तयारी सुरू केली.

नानासाहेब फडणवीस यांनी पण मराठे, निजाम, आणि हैदर यांना एकत्र येऊन इंग्रजांविरुद्ध लढण्याची तयारी केली. मराठ्यांकडचे भोसले आणि निजाम आयत्या वेळेला बाजूला झाले. त्यामुळे पेशवे आणि हैदर यांनीच इंग्रजांविरुद्ध युद्ध केले. आपला निभाव लागत नाही हे पाहून इंग्रजांनी महादजी शिंदे यांबरोबर साल्बाई इथे तह करून युद्ध थांबवले. या तहामुळे महादजी शिंदे यांचे पुणे दरबारात वर्चस्व वाढले.

पेशवाईच्या अखेरच्या काळात मराठी राज्यात दोन मोठे कर्तबगार पुरुष होऊन गेले त्यापैकी एक म्हणजे नाना फडणवीस आणि दुसरे म्हणजे महादजी शिंदे.

महादजी शिंदे म्हणजे राणाजी शिंदे यांचा मुलगा. पानिपतच्या पराभवानंतर जी मंडळी परत आली त्यात महादजी होते. दत्ताजी व जनकोजी शिंदे हे त्यांचे भाऊ पानिपतच्या युद्धात मारले गेले. याआधी महादजी यांनी उत्तरेत आपले वर्चस्व राखले होते आणि मराठी सत्ता स्थापन केली होती. त्यांनी शाह आलम या बादशहाला दिल्लीच्या गादीवर बसवले होते. पुढे माधवरांच्या अकाली मृत्यूमुळे आणि नारायणराव चा खून झाल्यामुळे मराठ्यांना उत्तरेतील राजकारणाकडे लक्ष द्यायला वेळ मिळाला नाही. साल्बाईच्या तहानंतर महादजी यांनी मोठा पराक्रम करून मराठ्यांचे उत्तरेत वर्चस्व बसवले.

महादजी यांनी  फ्रेंच लष्करी अधिकाऱ्यांना नेमून आपल्या सैन्यात उत्तम कवायती फौज तयार केली, तसेच त्यांनी तोफा बनवण्याचे आणि दारू गोळा करण्याचे कारखाने उभारले आणि आपला तोफखाना सुसज्ज केला.

यावेळी दिल्लीचा बादशहा दुबळा झाला होता. त्याच्या सरदारांमध्ये वजीराची जागा मिळवण्यासाठी सतत भांडणे होत होती. यावेळी बादशहाने महादजी यांना मदतीला बोलावले. या संधीचा फायदा घेऊन महादजी उत्तरेत गेले आणि त्यांनी बादशहाला गादीवर बसवले, तसेच बादशहाच्या रक्षणाची जबाबदारी स्वीकारली. बादशहाने महादजीस वजीरी देऊ केली पण त्यांनी ती स्वीकारली नाही. महादजी यांच्या कामगिरीबद्दल बादशहाने त्यांना “वकील-इ-मुल्लक”  (बादशहाचा प्रमुख प्रतिनिधी) ही पदवी दिली. ती त्यांनी स्वतः करता न घेता पेशव्यांचा प्रतिनिधी म्हणून स्वीकारली आणि ते दिल्लीचा कारभार बघू लागले. या काळात त्यांनी उत्तम कवायती फौज तयार केली. तोफखाना मजबूत केला आणि इंग्रजांना धाकात ठेवले. अशा रीतीने सुमारे आठ-दहा वर्षे महादजींनी दिल्लीचा कारभार पाहिला.

महादजी यानंतर पुण्यात आले. त्यांनी पुण्याचे कारभारी होण्याचा विचार केला होता, मात्र त्यांनी तो विचार नंतर सोडून दिला आणि नानासाहेब फडणवीसांबरोबर

एकत्र कारभार केला. मात्र पुढील काही वर्षातच महादजी पुण्याजवळ वानवडी येथे मरण पावले. त्यांच्या निधनामुळे मराठी राज्याला खूप मोठा धक्का बसला आणि मराठी राज्याचे फार मोठे नुकसान झाले.

राक्षस भुवन च्या लढाईत मराठ्यांनी या आधी निजामाचा पराभव केला होता. मात्र त्यानंतर निजामाने हळूहळू आपली सत्ता बळकट केली आणि मराठ्यांना हक्काची चौथाई देण्यास नकार दिला. त्यामुळे मराठ्यांना खूप राग आला. निजामाची खोड मोडलीच पाहिजे असे नानासाहेबांनी ठरवले. त्यांनी शिंदे, भोसले, गायकवाड, आणि पटवर्धन या सगळ्या मराठ्यांना एकत्र केले आणि परशुराम भाऊ पटवर्धन यांच्या नेतृत्वात खर्डे या गावी लढाई करून निजामाच्या सैन्याची दाणादाण उडवली. मराठ्यांनी एकजुटीने घडवून मिळवलेला हा शेवटचाच विजय ठरला.

मराठ्यांनी आता सगळीकडे आपले वर्चस्व प्रस्थापित केले होते. दक्षिणेत त्यांचे दोन मोठे शत्रू होते - निजाम आणि टिपू. या दोघांनाही मराठ्यांनी वठणीवर आणले होते. तसेच उत्तरेत महादजी यांनी मराठ्यांचे वर्चस्व ठेवले होते. इंग्रजांनाही त्यांनी जरब बसवली होती. पण थोड्या दिवसात मराठ्यांचे सवाई माधवराव पेशवे आजारी पडले आणि वाताच्या लहरीत त्यांनी शनिवारवाड्यावरून उडी मारून आत्महत्या केली.

सवाई माधवरावांच्या मृत्यूनंतर राघोबांचा मुलगा “दुसरा बाजीराव” हा पेशवा झाला. या बाजीरावांना पेशवे पद मिळावे याला नाना फडणवीस यांचा विरोध होता, पण इच्छा नसताना त्यांना बाजीरावाला पेशवे पद द्यावे लागले. काही वर्षातच नाना फडणवीस हे मरण पावले.

नानांनी बाल पेशवे सवाई माधवराव यांचे पालन पोषण तसेच शिक्षण जबाबदारीने केले. राज्याच्या वसुलीची व्यवस्था पण चोख ठेवली. त्यांचे गुप्तहेर खाते पण कार्यक्षम होते. ते थोर मुत्सद्दी होते.

नाना फडणवीस यांच्या मृत्यूनंतर अवघ्या दोन वर्षात दुसऱ्या बाजीरावाने इंग्रजांबरोबर वसईचा तह करून आपले स्वातंत्र्य गमावले.

--

## धडा १७ - पेशवाईचा शेवट

सवाई माधवराव यांचा अपघाती मृत्यू झाल्यानंतर रघुनाथरावांचा मुलगा दुसरा बाजीराव यांना पेशवे पद मिळाले. दुसऱ्या बाजीरावाच्या हाती सत्ता देणं हे देशहिताचे नाही हे माहीत असतानाही इलाज नसल्यामुळे नाना फडणवीस यांनी दुसऱ्या बाजीरावला पुण्याला आणून गादीवर बसवले आणि राज्याचा कारभार आपल्या हाती ठेवला. नाना फडणवीस आणि रघुनाथराव यांच्यात वैर असल्यामुळे दुसऱ्या बाजीरावांनी नानाला कैदेत ठेवले. या घटनेमुळे राज्यकारभारात गोंधळ माजला.

महादजी शिंदे यांच्या मृत्यूनंतर कवायती सैन्याची जबाबदारी दौलतराव शिंदे यांच्याकडे आली. त्यांना खर्चा करता पैसे कमी पडल्यामुळे त्यांनी पुण्यातील धनवान लोकांना लुटून पैसा गोळा केला आणि नागरिकांवर जुलुम केला. दुसरा बाजीराव आपल्या विरुद्ध काहीतरी कारस्थाने करत आहे हे समजतात दौलतराव शिंदे यांनी नाना फडणवीस यांची कैदेतून सुटका केली. यावेळी दुसऱ्या बाजीरावाने नाना फडणवीस यांना राज्यकारभार पाहण्याची विनंती केली. मात्र नाना कंटाळले होते आणि त्यामुळे त्यांनी राज्यकारभारातून अंग काढून घेतले. त्यानंतर लवकरच त्यांचा मृत्यू झाला.

उत्तर भारतात शिंदे आणि होळकर यांच्यातले वैर विकोपाला जाऊन त्यांच्यात भांडणे सुरू झाली. यशवंतराव होळकर हे होळकर राज्याचे प्रमुख होते. त्यांचा भाऊ मल्हारराव होळकर यांना शिंदे यांनी ठार मारले हे कळल्यावर त्यांनी शिंदे यांचे उज्जैन शहर लुटले.

इकडे पुण्यात दुसऱ्या बाजीरावाने शिंदे यांची बाजू घेऊन यशवंतराव होळकर यांचा भाऊ विठोजी होळकर यांना हत्तीच्या पायी देऊन ठार केले. ही बातमी कळताच यशवंतराव होळकर पुण्यावर युद्ध करण्यासाठी चालून आले. शिंदे आणि दुसरा बाजीराव यांनी एकत्र येऊन होळकरांशी लढाई केली. मात्र होळकर यांचा विजय झाला. त्यांनी पुणे शहर लुटून खूप पैसा मिळवला. पराभूत दुसऱ्या बाजीरावाने पुण्यातून पळ काढला आणि तो थेट कोकणात इंग्रजांच्या आश्रयाला गेला. तिथे वसईला त्याने इंग्रजांशी तह केला. या तहानुसार दुसऱ्या बाजीरावाने आपले स्वातंत्र्य गमावले आणि तो इंग्रजांचा मांडलिक बनला.

दुसऱ्या बाजीरावने इंग्रजांचा आश्रय घेऊन मांडलिक बनला आहे हे कळतात मराठी सरदारांमध्ये संतापाची लाट उसळली. त्यांनी दुसऱ्या बाजीरावाला विरोध करायचे ठरवले. आम्हाला न विचारता दुसऱ्या बाजीरावाने हा तह केला आहे, त्यामुळे आम्ही तो मानणार नाही असे त्यांनी इंग्रजांना सांगितले, मात्र इंग्रजांनी हा तह तुम्हाला मान्य करावाच लागेल असे सांगितले. त्यावेळी शिंदे आणि भोसले यांनी एकत्र येऊन इंग्रजांविरुद्ध लढाई करण्याचे ठरवले. शिंदे आणि होळकर यांच्यामध्ये वैर असल्यामुळे होळकर तटस्थ राहिले. इंग्रजांनी शिंदे यांचा पराभव केला, तसेच शिंदे यांच्या ताब्यात असलेला दिल्लीतील बादशाहला पण त्याने आपल्या ताब्यात घेतले. नंतर इंग्रजांनी भोसले यांच्याशी युद्ध करून त्यांचाही पराभव केला.

आता होळकर आणि इंग्रजांच्या मध्ये युद्ध सुरू झाले होळकरांनी गनिमी कावा पद्धतीने इंग्रजांना जेरीस आणले, त्यामुळे इंग्रजांनी होळकरांबरोबर दोस्तीचा तह केला. शिंदे आणि होळकर यांच्याबरोबर इंग्रजांनी दोस्तीचे धोरण ठेवावे असा इंग्लंड वरून आदेश आल्यामुळे इंग्रज अधिकारी तसे वागले.

इंग्रजांच्या मदतीने पुण्यात आल्यावर दुसऱ्या बाजीराव पेशव्याने जवळ जवळ पंधरा वर्षे राज्य केले. त्याने अनेक निष्ठावंत सरदारांच्या जहागिरी जप्त केल्या. इंग्रजांचे संरक्षण असल्यामुळे तो बेधडक पणे वागू लागला. शेतकऱ्यांवर जुलून

करू लागला. त्यामुळे लोकांमध्ये असंतोष पसरला. स्वतः बाजीराव दानधर्म, भोजन, समारंभ व नाच-गाणी करण्यात दंग राहिला. सदाशिव माणकेश्वर या कीर्तनकाराला आपला मुख्य कारभारी म्हणून नेमले. त्यानंतर सर्व कारभार विस्कळीत झाला.

पुढील काळात दुसरा बाजीराव आणि इंग्रज यांच्यामध्ये बिनसले आणि दोघे युद्धाची तयारी करू लागले. पेशव्यांची गादी मिळावी या स्वार्थी हेतूनेच दुसऱ्या बाजीरावाने वसईचा तह केला होता. आता मात्र आपले स्वातंत्र्य परत मिळवण्यासाठी त्याने गुप्तपणे लढाईची तयारी केली.

दुसऱ्या बाजीरावाने अनेक मराठी सरदारांना इंग्रजांविरुद्ध लढण्यासाठी एकत्र बोलावले, मात्र या सरदारांना कळून चुकले होते की दुसरा बाजीराव हा नादान आहे, त्याचबरोबर इंग्रजांची ताकदही मोठी आहे. शेवटी दुसऱ्या बाजीरावाने एकट्याने इंग्रजांशी लढण्याचे ठरवले. दुसऱ्या बाजीरावाचे मुख्य सेनापती बापू गोखले यांनी पेशव्यांच्या आज्ञेप्रमाणे खडकी येथे इंग्रजांच्या फौजवर हल्ला केला. या लढाईत मराठ्यांचा पराभव झाला. हे पाहून दुसऱ्या बाजीरावाने पळ काढला. इंग्रजी सैन्याने थेट पुण्यात प्रवेश केला आणि शनिवारवाड्यावर ब्रिटिशांचे निशाण फडकवले.

पुढे कोरेगाव आणि अष्टी या ठिकाणी इंग्रज आणि मराठ्यांचे सैन्य यात लढाया झाल्या. अष्टीच्या लढाईत बापू गोखले यांनी पराक्रमाची शर्थ केली, मात्र या लढाईत त्यांना वीरमरण प्राप्त झाले. यावेळी इंग्रजांनी दुसऱ्या बाजीरावाला चारी बाजूंनी घेतले. अखेर धुळकोट येथे दुसरा बाजीराव इंग्रजांना शरण आला आणि त्याने पेशवाई वरील आपला हक्क सोडला. इंग्रजांनी पेशव्यांचे राज्य खालसा केले आणि दुसऱ्या बाजीरावाला आठ लाख रुपयांचा वार्षिक पगार देऊन कानपूर जवळील ब्रह्मावर्त या जागी ठेवले. काही वर्षाने या जागी दुसरा बाजीराव मरण पावला.

--

## धडा १८ - शूर मराठी सरदार

मराठी राज्याचा विस्तार अनेक मराठी सरदारांच्या चांगल्या कामगिरीमुळे झाला, विशेषतः शिंदे, होळकर, भोसले, गायकवाड, पटवर्धन हे मराठेशाहीचे आधारस्तंभ होते. उत्तर भारतात मराठ्यांनी जे विजय मिळवले त्याचे मुख्य श्रेय शिंदे व होळकर या घराण्यातील पराक्रमी पुरुषांकडे जाते. शिंदे आणि होळकर यांनी उत्तरेत आपल्या पराक्रम दाखवला, तर गायकवाडांनी गुजरात मध्ये, पटवर्धनांनी कर्नाटकात, आणि नागपूरच्या भोसल्यांनी थेट बंगालपर्यंत आपला वचक बसवला.

अहिल्याबाई होळकर यांनी २८ वर्षे राज्यकारभार चालवला. त्यांनी इंदोरच्या राज्यात शांतता आणि सुरक्षितता निर्माण केली. लोकांना सुखी केले. व्यापार आणि उद्योगधंदे यांना उत्तेजन दिले. त्यामुळे इंदूर ही मोठी व्यापार पेठ झाली.

अहिल्याबाईंनी खूप दानधर्म केला. त्यांनी भारतातील अनेक तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी घाट, देवळे, धर्मशाळा आणि विहिरी बांधल्या, तसेच अन्नछत्रे उभारली.

--

## धडा १९ - छत्रपती प्रतापसिंह

सातारचे छत्रपती दुसरे शाहू मरण पावल्यानंतर त्यांचा थोरला मुलगा प्रताप सिंह हे छत्रपती झाले, तेव्हा त्यांचे वय फक्त पंधरा वर्षांचे होते आणि ते, त्यांची आई आनंदीबाई उर्फ माईसाहेब यांच्या सल्ल्याने कारभार पाहू लागले.

दुसरा बाजीराव आणि प्रतापसिंह यांच्यात भांडण होते त्यामुळे दुसऱ्या बाजीरावाने प्रतापसिंहाला कैद करून ठेवले होते.

दुसऱ्या बाजीरावाचे इंग्रजांबरोबर युद्ध झाले, त्यामध्ये बाजीरावाचा पराभव झाला आणि बाजीराव बाजीराव उत्तरेत पळाला आणि प्रतापसिंह इंग्रजांच्या हाती लागला.

इंग्रजांनी प्रतापसिंह यांच्याशी तह केला आणि त्यांना आपले मांडलिक बनवले. ते वयाने लहान असल्यामुळे त्यांच्या राज्याचा कारभार बघण्यासाठी इंग्रजांनी एका अधिकाऱ्याची नेमणूक केली.

प्रतापसिंह हे खूपच हुशार स्वाभिमानी आणि तडफदार होते. त्यांनी गोरगरिबांची दुःखे दूर करण्यासाठी खूप खर्च केला. शाळा सुरू केल्या, दवाखाने उघडले, चांगले रस्ते बांधले, प्रतापगडावर शिवाजी महाराजांनी स्थापन केलेले भवानी मंदिर ताब्यात घेऊन त्याची चांगली व्यवस्था ठेवली, राज्यात शांतता प्रस्थापित करून न्यायनिवाडा आणि लोकांच्या कल्याणाच्या गोष्टी सुरू केल्या.

पुढे इंग्रज आणि प्रतापसिंह यांच्यात वाद झाले आणि इंग्रजांनी त्यांच्याविरुद्ध राजद्रोहाचा आरोप केला. त्याबद्दल त्यांना बनारस येथे कैदेत ठेवण्यात आले आणि त्यांना अतिशय वाईट वागणूक देण्यात आली. रंगो बापूजी या त्यांच्या अधिकाऱ्याने इंग्लंडमध्ये १४ वर्षे राहून या प्रकारणी न्याय मिळावा म्हणून खूप प्रयत्न केले, मात्र त्याला यश आले नाही आणि त्यादरम्यान प्रतापसिंह यांचे निधन झाले.

प्रतापसिंह यांच्या निधनानंतर त्यांचा भाऊ आप्पासाहेब याला इंग्रजांनी गादीवर बसवले, मात्र राज्याचे सर्व अधिकारी इंग्रजांनी स्वतःकडे ठेवले.

पुढे एका वर्षात आप्पासाहेब यांचे निधन झाले. त्यांना मुलगा नव्हता, मात्र त्यांनी मृत्यूपूर्वी एक मुलगा दत्तक घेतला होता. पण डलहौसीने हा दत्तक वारस नामंजूर करून साताऱ्याचे राज्य खालसा केले. अशा रीतीने मराठी राज्य संपुष्टात आले.

--

# धडा २० - १८५७ चा राष्ट्रीय उठाव

१८४८ पर्यंत जवळजवळ संपूर्ण भारत इंग्रजांनी त्यांच्या सत्तेखाली आणला होता. काही लहान राज्य राहिली होती, मात्र त्यांना कोणतेही स्वातंत्र्य नव्हते. डलहौसीने वेगवेगळी कारणे दाखवून तसेच  दत्तक वारस नामंजूर करून त्याने अनेक राज्ये खालसा केली.

यावेळी देशातील बऱ्यापैकी उद्योगधंदे बंद पडले आणि देशात खूपच गरीबी आली. धर्मांतर करणाऱ्यांना वारसा हक्क देण्यात आला त्यामुळे लोकांमध्ये राग निर्माण झाला.

सैनिकांवर पण अन्याय झाला. गोऱ्या सैनिकांपेक्षा भारतीय सैनिकांना कमी पगार होता, तसेच त्यांना लांब वर जाऊन लढाई करावी लागे. याचवेळी बंदुकीच्या काडतुसांवर गाय आणि डुकराची चरबी लावली आहे अशी बातमी पसरली आणि सैनिक अजूनच चिडले.

मंगल पांडे या सैनिकाने एका इंग्रज अधिकारावर गोळी घातली आणि १८५७ चा उठाव सुरू झाला. यानंतर मंगल पांडे यांना फाशी देण्यात आली.

या उठावात राणी लक्ष्मीबाई यांचे मोठे योगदान होते. त्या वेळी त्या फक्त २२ वर्षांच्या होत्या. त्या शूर आणि स्वाभिमानी होत्या. त्यांनी घेतलेला दत्तक मुलगा नामंजूर झाल्यामुळे इंग्रजांनी झाशीचे राज्य खालसा केले. हे कळल्यावर “मेरी झाशी नाही दुंगी” असा निश्चय झाशीच्या राणीने केला आणि इंग्रजांच्या विरुद्ध लढा दिला. इंग्रजांनी झाशीच्या किल्ल्याला वेढा दिला. त्यावेळेला तिला नाना पेशवे यांचा सेनापती तात्या टोपे यांनी मदत केली.

झाशीच्या किल्ल्याचा वेढा तोडून ती आपला दत्तक मुलगा दामोदर याला पाठीला बांधून घोड्यावरून बाहेर पडली. पुढे ग्वाल्हेरच्या किल्ल्यामध्ये तिने प्रवेश केला, मात्र तिथे इंग्रजांविरुद्ध लढताना तिचा मृत्यू झाला.

नानासाहेब पेशवे हे दुसऱ्या बाजीरावाचे दत्तक पुत्र होते. त्यांनी १८५७ च्या उठावात भाग घेतला होता. पुढे इंग्रजांबरोबर त्यांचे युद्ध झाले आणि त्यात त्यांचा पराभव झाला. त्यानंतर ते नेपाळ मध्ये पळाले आणि तिकडेच निधन पावले.

१८५७ च्या उठावातील अजून एक महत्त्वाचे नाव म्हणजे तात्या टोपे. हे खूप शूर लढवय्ये होते. ग्वाल्हेरच्या किल्ल्याला इंग्रजांनी वेढा घातल्यानंतर सुमारे दोन वर्ष त्यांनी इंग्रजांबरोबर युद्ध केले. मात्र फितुरी झाल्यामुळे इंग्रजांनी त्यांना पकडले आणि फासावर लटकवले. अशा रीतीने १८५७ च्या राष्ट्रीय उठावाचा शेवट झाला आणि भारतीय जनतेचा इंग्रजांविरुद्ध स्वतंत्र होण्याचा प्रयत्न अयशस्वी झाला.

---

## "पेशवाई अभ्यास वर्ग" परीक्षा - प्रमाणपत्राचा नमुना




500
भारत
INDIA
बाजीराव पेशवा
BAJI RAO PESHWA
2004